कोकणसाद
www.kokansad.com

रविवार दि. २६ जून २०२२

# दोडामार्ग येथे उद्या रक्तगट तपासणी शिबीर

## सिंधुरक्तमित्र प्रतिष्ठानतर्फे दोडामार्ग शाखेचा उपक्रम

**कोकणसाद वृत्तसेवा**

**दोडामार्ग** : सिंधू रक्तमित्र प्रतिष्ठान, सिंधुदुर्गच्या दोडामार्ग शाखा अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर अध्यक्ष विवेकानंद नाईक यांच्या नेतृत्वाखाली दोडामार्ग तालुक्यात रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे येत्या २७ जूनला दोडामार्ग तालुका वर्धापनदिनी आयोजन करण्यात आले आहे.

सोमवारी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत लक्ष्मीबाई सीताराम हळबे कॉलेज, दोडामार्ग येथे रक्तगट तपासणी व हिमोग्लोबिन तपासणी कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अरुण खानोलकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर ऐवळे यांना निमंत्रित करण्यात आले आहे. दोडामार्ग तालुका वासियांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिंधू रक्तमित्र प्रतिष्ठानचे दोडामार्ग तालुकाध्यक्ष विवेकानंद नाईक व सहकारी आणि लक्ष्मीबाई सीताराम हळबे कॉलेजच्यावतीने करण्यात आले आहे.